ISSN 2394-5303

# प्रिंटिंग एरिया®

Peer Reviewed International Multilingual Research Journal



Editor
Dr.Bapu G.Gholap

आंतरराष्ट्रीय बहुभाषिक शोध पत्रिका

# प्रिंटिंग एरिया

**Printing Area International Interdisciplinary Research Journal in Marathi, Hindi & English Languages**

**September 2019, Issue-57, Vol-01**

**Editor**
**Dr. Bapu g. Gholap**
(M.A.Mar.& Pol.Sci.,B.Ed.Ph.D.NET.)

**Co-Editor**
**Dr. Ravindranath Kewat**
(M.A. Ph.D.)

"Printed by: **Harshwardhan Publication Pvt.Ltd.** Published by **Ghodke Archana Rajendra** & Printed & published at Harshwardhan Publication Pvt.Ltd.,At.Post. Limbaganesh Dist,Beed -431122 (Maharashtra) and Editor **Dr. Gholap Bapu Ganpat.**

Reg.No.U74120 MH2013 PTC 251205

**Harshwardhan Publication Pvt.Ltd.**
At.Post.Limbaganesh,Tq.Dist.Beed
Pin-431126 (Maharashtra) Cell:07588057695,09850203295
harshwardhanpubli@gmail.com, vidyawarta@gmail.com

All Types Educational & Reference Book Publisher & Distributors / www.vidyawarta.com

# Printing Area


www. विद्यावार्ता .कॉम

YouTube Channel

*Vidyawarta is peer reviewed research journal. The review committee & editorial board formed/appointed by Harshwardhan Publication scrutinizes the received research papers and articles. Then the recommended papers and articles are published. The editor or publisher doesn't claim that this is UGC CARE approved journal or recommended by any university. We publish this journal for creating awareness and aptitude regarding educational research and literary criticism.*

*The Views expressed in the published articles,Research Papers etc. are their writers own. This Journal dose not take any libility regarding appoval/disapproval by any university, institute, academic body and others. The agreement of the Editor, Editorial Board or Publicaton is not necessary.*

***If any judicial matter occurs, the jurisdiction is limited up to Beed (Maharashtra) court only.***


Indexed

IMPACT FACTOR 6.039 IIJIF

Cosmos IMPACT FACTOR 5.395

*Govt. of India, Trade Marks Registry Regd. No. 3418002*

http://www.printingarea.blogspot.com

27) मंदिर स्थापत्याचा महत्त्वपूर्ण घटक द्वारशाखा
**डॉ.सोमवंशी एस.आर.,लातूर** || 115

28) ग्रंथालय शास्त्राचे पाच सिद्धांत आणि माहितीप्रधान समाज : संक्षिप्त आढावा
**श्री. दिलीप गोविंदा पाटील, जिल्हा— रायगड** || 117

29) असंगठित क्षेत्र में कार्यरत जनजातीय महिलाओं में भूमिका संघर्श ......
**सरस्वती भट्ट जोशी व डॉ॰ रेनू प्रकाश, अल्मोड़ा** || 122

30) संत समर्थ रामदासस्वामींचे अध्ययन व संगीत
**विद्या उत्तमराव धोटे (बोंडे), यवतमाळ.** || 133

31) कबीर का स्वानुभूत दर्शन
**डॉ.ज्योति मिश्रा , सम्बलपुर (ओड़िशा)** || 135

32) जनजातीय समाज महिलाओं की सामाजिक आर्थिक स्थिति का अध्ययन
**डॉ.दुर्गेश नंदनी साहू,रायपुर (छ.ग.)** || 142

33) पर्वत—गुफाओं को काटकर आवास बनाने की कला—बौध विहार
**प्रो.रश्मि जोश, कुमारी ममता शाक्य भोपाल म.प्र.** || 144

34) जगद्गुरु रामभद्राचार्य की शैक्षिक विचारधारा
**डॉ.नीरज कुमार शुक्ल, उत्तराखण्ड** || 146

35) **राम–काव्य में प्रतिबिंबित नारी जीवन का आदर्श**
**डॉ. बिंद कुमार चौहान,** असम || 154

36) **गुजरात में शिक्षा क्षेत्र का विकास**
**Vijaybhai B. Chauhan** , Borsad. || 157

37) भारतीय राग संगीत के साहित्य में शिव और गौरा पार्वती: एक अवलोकन
**डॉ राजेश गोपालराव केलकर** || 161

38) अवधी लोकमंगलकारी सोहर गीतों की संवेदना और वैशिष्ट्य : संवेदना और वैशिष्ट्य :
**डॉ.(श्रीमती) मनोरमा मिश्रा, नई दिल्ली.** || 165

39) विज्ञान और साहित्य : एक-दूसरे के पूरक
**डॉ.ए. सन्यासि राव** , विशाखपट्टणम || 170

www.vidyawarta.com/03 | http://www.printingarea.blogspot.com

28

# ग्रंथालय शास्त्राचे पाच सिद्धांत आणि माहितीप्रधान समाज : संक्षिप्त आढावा

**श्री. दिलीप गोविंदा पाटील**
ग्रंथपाल,
को.ए.सो. लक्ष्मि शालिनी महिला महाविद्यालय,
पेझारी — अलिबाग, जिल्हा— रायगड

**सारांश:**

प्रस्तुत लेखामध्ये, भारतातील ग्रंथालय शास्त्राचे जनक डॉ. एस. आर. रंगनाथन यांनी सांगितलेले, ग्रंथालय शास्त्राचे पाच मूलभूत सिंद्धांताचा आढावा घेतलेला असून त्याची पार्श्वभूमी स्पष्ट केलेली आहे. कोणत्याही शास्त्राला काही मूलभूत तत्वे असतात. भारतात पूर्वी ग्रंथालये अस्तित्वात होती परंतु, त्या ग्रंथालयाना शास्त्रीय बैठक नव्हती. त्यामुळे ग्रंथालयाचा विकास झालेला नव्हता. अश्या ग्रंथालयांना डॉ. एस. आर. रंगनाथन यांनी पाच मूलभूत तत्वे देवून तात्विक बैठक देण्याचे महान कार्य केले. म्हणून त्यांचे भारतातील ग्रंथालय चळवळीचे पितामह म्हणून नांव अजरामर आहे. तसेच प्रस्तुत लेखात ग्रंथालयाच्या पाच मूलभूत सिद्धांताचा आधार घेवून ग्रंथालयाचे कामकाज चालले पाहिजे, यासाठी वेगवेगळ्या संकल्पना राबविणे गरजेचे आहे यासंबंधी माहिती दिलेली आहे.

**प्रस्तावना :**

भारतातील ग्रंथालय शास्त्राचे जनक डॉ. एस. आर. रंगनाथन यांची सन १९२४ मध्ये मद्रास विद्यापीठाचे पहिले विद्यापीठ ग्रंथपाल म्हणून नियुक्ती झाली. १९२४ मध्ये मद्रास विद्यापीठाने ग्रंथालय शास्त्राच्या अभ्यासासाठी युनिवर्सिटी लंडनला पाठविले. लंडन येथील क्रायडन सार्वजनिक ग्रंथालयात डॉ. रंगनाथन यांनी भेट देवून अभ्यास केला. तसेच डब्ल्यू. सी. बर्विक यांच्या मार्गदर्शनाखाली ग्रेट ब्रिटन येथील अनेक ग्रंथालयांना भेटी दिल्या, तेथील कामकाजाचे निरीक्षण केले. क्रायडन येथील ग्रंथालयात प्रत्यक्ष काम करून अनुभव घेतला. यानंतर त्यांच्या मनात विचार चक्र सुरु झाले. ग्रंथालय म्हणजे काय? ते कोणासाठी आहे? त्याचे उद्धिष्ट काय? त्याचे संघटन आणि व्यवहार कोणत्या तत्वानुसार चालावे. यासाठी काही मार्गदर्शक तत्वे, सूत्रे, वा सिद्धांत आहेत काय? याचा विचार करून त्यांनी पुढील पाच मूलभूत सिद्धांत मांडले आणि ते Five Laws of Library Science या ग्रंथामध्ये १९३५ साली प्रसिद्ध केले.

**ग्रंथालय शास्त्राचे पाच मुलभूत सिद्धांत:**

**१. ग्रंथ हे उपयोगासाठी आहेत :**

ग्रंथालय सेवा सर्व स्तरापर्यंत पोहोचली पाहिजे, म्हणजेच ग्रंथाचा वापर जास्तीत जास्त झाला पाहिजे. कारण ग्रंथ हे उपयोगासाठीच निर्माण झाली असतात. असे मत डॉ. एस. आर. रंगनाथन यांनी आपल्या ग्रंथात स्पष्ट केले. त्यासाठी, ग्रंथालयात ग्रंथनिवड करतांना ग्रंथालयाच्या स्थानाचा विचार करता त्या ठिकाणच्या वाचक वर्गाची वाचन विषयक आवड व त्यांच्या गरजा लक्षात घेवून ग्रंथाची निवड झाली पाहिजे असे सांगितले. ग्रंथालयाचा प्रवेश अगदी सुलभ असावा. ग्रंथालयात फर्निचर उपयोगक्षम असावे. खेळती हवा, नैसर्गिक प्रकाश, या दृष्टीने ग्रंथदालन असावे. वाचकांना आरामात बसून वाचन व लेखन करता येईल अशी व्यवस्था ग्रंथालय प्रशासनाने करावी. ग्रंथवर्गीकरण वाचकाभिमुख असावे. वाचकांना सहज उपलब्ध होतील, सापडतील त्याप्रमाणे ग्रंथाची रचना असावी आणि योग्य ठिकाणी ठेवावेत. त्याकरिता तालिका सूटसुटीत असावी जेणेकरून तालीकेच्या आधारे वाचकांना हवा असलेला ग्रंथ, ग्रंथालयात आहे किंवा नाही हे पटकन लक्षात येईल. ग्रंथालयातील सेवक वर्ग प्रशिक्षित तर हवेच, परंतु ग्रंथालयात येणाऱ्या वाचकांचे हसतमुखाने स्वागत करणारे ही हवेत. ग्रंथांचा जास्तीत जास्त उपयोग झाला पाहिजे म्हणून वेळोवेळी ग्रंथ—प्रदर्शनाचे आयोजन केले पाहिजे. काही ग्रंथ कालबाह्य झालेले असतात असे ग्रंथ ग्रंथालयातून काढून टाकल्यास त्याजागी नवीन ग्रंथाना स्थान मिळेल. नवीन ग्रंथाचा परिचय होण्यासाठी शक्य झाल्यास नवीन स्वतंत्र कक्षात त्याचे सतत

प्रदर्शन भरवावे. ग्रंथालय जास्तीत जास्त वेळ वाचकांसाठी उघडे ठेवल्यास ग्रंथालयाचा उपयोग अधिक वाचक मोठ्या प्रमाणात करतील. बहुतेक विचारवंत असे म्हणतात की, ग्रंथालयाची इमारत मोठी आणि देखणी किंवा ग्रंथाचा साठा मोठा आहे म्हणून ग्रंथालय चांगले नव्हे, तर ज्या ग्रंथालयातील वाचनसाहीत्याचा उपयोग जास्तीत जास्त केला जातो, ते ग्रंथालय चांगले. आजच्या आधुनिक काळात ग्रंथालयाचा उपयोग मोठ्या प्रमाणावर होण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून ग्रंथालय विषयक सेवा–सुविधा देण्यासाठी ग्रंथालयांनी भौगोलिक सीमाही ओलांडल्या आहेत.

**२. प्रत्येक वाचकाला त्याचा/तिचा ग्रंथ मिळावा.**

या सिद्धांतामध्ये वाचकाचे महत्व विषद केले आहे. हा सिद्धांत अधिक तपशील देतो. वाचकांचे वय, आवड, वाचकांचे प्रकार, याप्रमाणे प्रत्येक वाचकाची वाचनसाहीत्याची गरज वेगवेगळी असते. म्हणून ग्रंथालयात प्रत्येकाच्या आवडीप्रमाणे वाचनसाहीत्य असणे हे महत्वाचे आहे. हा सिद्धांत नव्या ग्रंथालय स्थापनेला पोषक ठरतो. या सिद्धांतामध्ये वाचक व त्याच्या गरजा यांना महत्व प्राप्त झाले आहे. पण वाचकांच्या गरजा जाणून घेणे, समजून घेणे तेवढे सोपे नाही. काही वेळा वाचकांना त्यांच्या गरजा स्पष्ट मांडता येत नाहीत. यासाठी नवीन ग्रंथाच्या याद्या, ग्रंथ परीक्षणे, प्रदर्शने, या गोष्टी त्यांच्या मदतीला येतात. वाचकांशी संवाद सुद्धा वाचकांच्या गरजा जाणून घेण्याचा एक मार्ग आहे. वर्तमान परिस्तिथीत सर्वांसाठी शिक्षण हे मान्य झाले आहे. फिरती ग्रंथालये, ग्रामीण वाड्या –वस्त्यावरील वाचकांच्या गरजा भागवू लागली. प्रौढांसाठी शिक्षण, नवसाक्षरासाठी, अंधांसाठी, महिलासाठी, बाल वाचकासाठी साहित्य निर्माण होवू लागले. हे सर्व साहित्य त्यांच्या आवडीनुसार ग्रंथालयात उपलब्द होणे गरजेचे आहे. वाचकांना समजून घेणे गरजेचे आहे, त्यांच्या वाचनविषयक गरजा समजून घेणे गरजेचे आहे. असे डॉ. एस. आर. रंगनाथन सांगतात. एखाद्या ग्रंथालयात एखाद्या वाचकास हवा असलेला ग्रंथ उपलब्ध नसेल या वेळी ग्रंथालय जाळ्यामार्फत अथवा आंतरग्रंथालयाद्वारे उसने पुस्तक आणून संबंधित वाचकांची मागणी पूर्ण करावी.

ज्याप्रमाणे भारतीय घटनेने प्रत्येक व्यक्तीस काही मूलभूत अधिकार दिलेले आहेत, त्याचप्रमाणे ग्रंथालय शास्त्रच्या या दुसऱ्या सिद्धांताने ज्ञानप्राप्तीचा अधिकार प्रत्येक व्यक्तीस प्रदान केला आहे. या सिद्धांतामुळे समाजातील सर्व प्रकारचे भेद नष्ट करून ज्ञान प्राप्ती साठी सर्व एकाच स्तरातील आहोत, हे दर्शवून दिले. त्यामुळे या सिद्धांताला खूप महत्व आहे.

**३. प्रत्येक ग्रंथाला त्याचा वाचक मिळाला पाहिजे.**

प्रथम सिद्धांताप्रमाणे हा तिसरा सिद्धांत सुद्धा ग्रंथाच्या बाजूने विचार करावयास लावतो. या सिद्धांतानुसार ग्रंथ, प्रलेख, किंवा वाचन साहित्य हा घटक महत्वाचा आहे. म्हणून ग्रंथ या दृष्टीकोनातून स्पष्टीकरण देणारा विचार या सिद्धांतात केला आहे. ग्रंथ, हे वाचकांनी उपयोग करावे यासाठीच असतात. हा विचार मान्य झाला आहे. पण म्हणून ग्रंथ आपणहून वाचकापर्यंत पोहोचू शकत नाहीत, म्हणून ग्रंथाना वाचकाच्या संपर्कात आणने हे ग्रंथपालाचे कर्तव्य आहे. मात्र यासाठी ग्रंथपालाने ग्रंथ–जगताची माहिती करून घेणे आवश्यक असते आणि त्यातील प्रत्येक ग्रंथाच्या योग्य वाचकांचा शोध घेत राहिले पाहिजे. कोणत्या ग्रंथामुळे कोणत्या वाचकांना फायदा होईल हे ओळखून, त्या मौल्यवान ग्रंथाकडे त्या त्या वाचकाचे लक्ष वेधून घेतले पाहिजे. नाहीतर अनेक ग्रंथ निष्काळजीपणामुळे निरुपयोगी पडून राहतील. ते टाळण्यासाठी, ग्रंथापालने आणि ग्रंथालय कर्मचाऱ्याने ग्रंथाच्या उपयोगासाठी मध्यस्त म्हणून काम केले पाहिजे. हे साध्य व्हावे म्हणून ग्रंथालयाचे स्थान, इमारत, वाचनकक्ष, फर्निचर, ग्रंथाची व्यवस्था, प्रचार, संदर्भ–सेवा, आणि ग्रंथालयातील कर्मचारी, या सर्वांचा विचार महत्वाचा असतो. मुक्तद्वार प्रणालीमुळे, ग्रंथ हरविणे किंवा ते चुकीच्या जागेवर ठेवणे असे काही तोटे ही होतात. परंतु जास्तीत जास्त ग्रंथाना वाचक मिळवून देण्याच्या फायद्यापेक्षा ते तोटे कमीच ठरतात, सामान्य वाचक काही चोर नसतात, चोरी होणे हे अपवादाने घडणारी गोष्ट आहे. म्हणून सर्व वाचकाना ग्रंथाजवळ जाण्यास मनाई करणे योग्य नसते. म्हणून मुक्तद्वार प्रणालीची योजना करून ग्रंथाना

वाचक मिळवून देण्याचा प्रयत्न करणे योग्य ठरते. अश्या तऱ्हेने अनेक मार्गांनी प्रयत्न करून तिसऱ्या सिद्धांताचे पालन करता येईल.

**४. वाचकांचा वेळ वाचला पाहिजे.**

ग्रंथालयात किंवा माहिती केंद्रात, ग्रंथाचा किंवा तेथील माहितीचा उपयोग करण्यासाठी वाचक येत असतात. ग्रंथातून तसेच अन्य प्रकारच्या वाचन साहित्यातून माहिती प्राप्त करून तिचा आपल्या संशोधनातून त्यांना उपयोग करायचा असतो. ते सतत कार्यमग्न राहणारे वाचक असतात. त्यामुळे त्यांचा वेळ मौल्यवान मानला जातो. तो माहिती शोधण्यात वाया जावू नये असा या सिंद्धान्ताचा अर्थ आहे. हा सिद्धांत खऱ्या अर्थाने प्रत्यक्षात आणावयाचा असेल तर, ग्रंथालयाच्या स्थापनेपासून त्याच्या अंतर्गत रचनेपर्यंत प्रत्येक गोष्टीचे नियोजन काळजीपुर्वक करावे लागते. वाचकाचा वेळ वाचवून त्यांना कार्यक्षमतेने सेवा देणाऱ्या ग्रंथालयीन कर्मचाऱ्याचा वेळ ही महत्वाचा असतो. म्हणून वाचकांचा आणि ग्रंथालय सेवकांचा वेळ वाचेल अशा योजना कराव्या लागतात. ग्रंथालयात मुक्तद्वार पद्धतीचा अवलंब करून, वाचकांना कपाटाजवळ जावून ग्रंथ शोधण्याची संधी उपलब्ध करून दिल्यास त्यांना पाहिजे असलेल्या अनेक ग्रंथाचा परिचय होईल आणि त्यात कमी वेळात अनेक ग्रंथ उपलब्ध होतील. ग्रंथाची कपाटातील रचना शास्त्रीय पद्धतीनुसार आणि वाचकांना शोधण्यास सहज उपलब्ध होतील अशी ग्रंथ रचना असावी. ग्रंथाचे वर्गीकरण शास्त्रीय पद्धतीने केल्यास एकाच शीर्षकाचे ग्रंथ एकाच खणात सापडतील. यामध्ये सुद्धा वाचकांचा वेळ वाचेल. ग्रंथाचे तालीकीकरण केल्यास लेखकाच्या नावाने, शीर्षकाच्या नावाने, संपादकाच्या नावाने, प्रकाशकाच्या नावाने ग्रंथ शोधण्यास मदत होईल व यात सुद्धा वाचकाचा वेळ वाचेल. याशिवाय ग्रंथसंग्रह बाबत मार्गदर्शिका, विषयानुसार संदर्भ ग्रंथसूची, संदर्भ सेवा, ग्रंथ देवाण–घेवाणाची सहज सोपी पद्धत अवलंबिल्यास वाचकांचा आणि सेवकांचा सुद्धा वेळ वाचेल.

ग्रंथालयाच्या चौथ्या सिद्धांताने ग्रंथालय जगतात मोठा बदल घडवून आणला आहे. वाचकाच्या बाजूने प्रत्येक बाबीचा विचार करावा हे या सिद्धांताने सूचित केले आहे.

**५. ग्रंथालय ही वाढती 'वर्धिष्णू' संस्था आहे.**

ग्रंथालयाचे प्रथम चार सिद्धांत, ग्रंथालयाच्या अंतर्गत व्यवस्थेशी विचार करायला लावतात तर पाचवा सिद्धांत ग्रंथालय या संस्थेच्या महत्वपूर्ण बाबीसंबंधी विचार करायला लावतो. हा सिद्धांत जीवन तत्वज्ञानावर आधारित आहे. जीवशास्त्र विषयाच्या तत्वानुसार फक्त वाढता जीवच जगू शकतो व ज्यावेळी त्याची वाढ थांबते त्याच क्षणी जीव नष्ट होतो. हे जीवशास्त्र विषयातील तत्व ग्रंथालयाला लागू पडते. ग्रंथ, वाचक, व ग्रंथालय सेवक हे ग्रंथालयाचे तीन प्रमुख घटक आहेत. ग्रंथालयाच्या स्थापनेपासून ग्रंथ संग्रहात वाढ होत असते. ग्रंथ संग्रहाच्या वाढी सोबतच फर्निचर, उपकरणे, व सेवक वर्गाच्या संख्येत वाढ करणे आवश्यक ठरते. म्हणजेच ग्रंथालयाची सर्व बाजूने सतत वाढ होत असते. अश्या सर्व बाजूनी वाढणाऱ्या ग्रंथालयासाठी इमारत अश्या पद्धतीने बांधावी की, त्यात सर्व बाजूने वाढ करता येईल. नवीन व प्रचलित विषयासाठी वर्गीकरण पद्धतीची सोय असली पाहिजे. ज्ञानाच्या कक्षा जशा वाढतील तशी सोय वर्गीकरण पद्धतीत असावी. ग्रंथालयात वाढीव ग्रंथ संग्रह, वाचक, फर्निचर, सेवकवर्ग, ग्रंथालय सेवा इत्यादी विचारात घेवून ग्रंथालयाचे नियोजन केले पाहिजे व ग्रंथालय परिपूर्ण कसे होईल याचा विचार करून नियोजनबद्ध पद्धतीने जर योजना राबविल्या तर ग्रंथालयात वाढ झाल्याने निर्माण होणाऱ्या समस्यांवर मात करणे शक्य होईल.

ग्रंथालय शास्त्राच्या सूत्राची अंमलबजावणी करताना, आधुनिक काळाचा विसर पडता कामा नये. आधुनिक काळात ग्रंथालयाच्या साधनामध्ये भर घालणे आवश्यक आहे. ग्रंथालयात संगणकाचा वापर करणे ही तर अत्यावश्यक बाब आहे. नवीन तंत्रज्ञानाचा वापर केल्याने ग्रंथालयाच्या कार्याचा स्तर उंचावेल, सेवकांची कार्यक्षमता वाढेल व डॉ. एस. आर. रंगनाथन यांच्या मूलभूत सिद्धांताची अंमलबजावणी उत्तमरीतीने होवू शकेल.

**माहिती:**

माहिती सी संकल्पना 'डेटा' या संज्ञाशी

संबंधित आहे. 'डेटम' या संज्ञेवरून 'डेटा' या संज्ञेचा शोध लागला. या संज्ञेचा अर्थ 'घटना', आकडेवारी, किंवा माहिती असा आहे. 'डेटा'चे माहितीत रुपांतर करण्यासाठी त्यातील अव्यवस्थित घटकाची तर्कशुद्ध फेरमांडणी करावी लागते. डेटा आणि माहिती याची नीटनेटकी रचना करून ती संगणकाच्या स्मरणमंजुषेमध्ये साठवली जाते. यालाच डेटाबेस असे म्हणतात. तेव्हाच त्याचा माहिती म्हणून उपयोग होतो. मानवी इतिहासात, माहितीची भूमिका महत्वाची आहे. विकासाशी तर तिचा फार जवळचा संबंध आहे. ही काल्पनिक घटना, निरीक्षण, मूलभूत माहिती ज्ञान, अनुभव इत्यादीशी संबंधित आहे. या संकल्पना म्हणजे मानवी मनाची निर्मिती आहे. या संकल्पनाचा सतत अनुभव काही निष्कर्षाला कारणीभूत होतात. या निष्कर्षाचे एकत्रीकरण मनामध्ये होते. हे निष्कर्ष दुसऱ्याला सांगितले जातात. म्हणजेच त्याचे माहितीत रुपांतर होते. माहितीची स्वरूपे अनेक आहे. गद्य, आकडेवारी, चित्रे, संगणकीय तबकड्या, सीडी, इंटरनेट, सोशल मिडिया साधने, ही माहिती व्यक्तीच्या संप्रेषणाने होते. माहितीमध्ये सर्वसमावेशकता, सहज उपलब्धता, अचूकता, हे निकष असले पाहिजेत तर ती माहिती योग्य व यतार्थ ठरेल.

**माहितीशास्त्र:**

माहितीशास्त्र म्हणजे ज्ञानाची उत्पत्ती, साठा, प्रतीप्राप्ती, आदानप्रदान रुपांतर, स्थलांतर व वापर या सर्वांचा संगम म्हणजे माहितीशास्त्र होय. यामध्ये माहितीची स्वाभाविक व कृत्रिम प्रणालीत मांडणी, संदेशाच्या आदान—प्रदाना साठी, योग्य चिन्हाचा वापर या सर्व गोष्टी समाविष्ट असतात. अमेरिकेतील प्रलेख संदर्भातील कार्यपद्धती च्या संदर्भात, केल्व्हिन मूर या विचारवंतानी माहितीची प्रतीप्राप्ती ही संज्ञा विकसित केली आणि १९५० मध्ये प्रसारित केली. पण माहितीशास्त्र ही संज्ञा १९५९ साली उदयास आली.

**ग्रंथालय आणि माहितीशास्त्र:**

ग्रंथालय म्हणजे ग्रंथसंग्रह हा अर्थ पूर्वी अभिप्रेत होता. पण १९ व्या शतकापासून विविध विषय व त्याच्या उपशाखा यावर वेगवेगळ्या स्वरुपात माहिती प्रकाशित होवू लागली. समाजाची संस्कृती भविष्यकाळात जतन करण्यासाठी निर्माण झालेले ग्रंथ, नियतकालिके, प्रलेख इत्यादीचे स्वरूप बदलू लागले. माहितीच्या साठ्यासाठी हार्डडीस्क, सीडी, वेबसाईट, संगणकीय तबकड्या, मायक्रो फिल्म, इंटरनेट, व अन्य तांत्रिक साधने इत्यादीचा उपयोग होवू लागला.

**ग्रंथालय आणि माहितीकेंद्र:**

आजच्या काळात तंत्रज्ञानाने ग्रंथालयाचे स्वरूप बदलले. माहितीच्या परीस्पोटामुळे कागदविरहित ग्रंथालये अंकीय, आभासी, डिजिटल ग्रंथालय, ग्रंथालय अप, ह्या संकल्पना अस्तित्वात आल्या. ग्रंथालयात इंटरनेट, ई—बुक, ई—जर्नल, ई—मेल, ही साधने प्रचारात आली. उपग्रह ह्या सारख्या साधनातून संप्रेषणाची साधने, ग्रंथालय आणि माहितीशास्त्र व माहितीकेंद्राचे महत्व वाढविण्यास कारणीभूत ठरून ग्रंथालय व माहितीकेंद्र उदयास आली. त्यासाठी ग्रंथालय साफ्टवेअर ची निर्मिती झाली. काही विचारवंताच्या मते माहितीशास्त्र हे ग्रंथालयाचे विस्तारित स्वरूप आहे असे मत व्यक्त करू लागले.

**माहितीप्रधान समाज:**

माहिती समाज ही संकल्पना एक सार्वजनिक धोरण असून म्हणून सुद्धा ओळखली जाते. जगातील जपान हा देश या सार्वजनिक धोरणाचा स्वीकार करून माहिती समाजाचा विकास करणारा पहिला देश आहे. आता जगातील सर्वच देशातील समाज हा माहितीप्रधान समाज बनलेला आहे. माहिती हा जसा मानवी मनातील घटक आहे, त्याचप्रमाणे तो जगतातील अतंत्य महत्वाचा घटक आहे. आपली शैक्षणिक, आर्थिक, सामाजिक प्रगती ही परिवर्तनीय विज्ञान व तंत्रज्ञानाच्या माहितीवर अवलंबून असते. माहितीच्या युगात माहितीचे मूल्य व तिचा वापर याबद्दल समाजामध्ये जागरुकता निर्माण झालेली आहे. माहिती युगामुळे मानवाचे दैनदिन जीवन ढवळून निघाले आहे. मानवी समाजाच्या विकासामध्ये शेती, औद्योगिक, व संगणक या तीन क्रांतीचा फार महत्वाचा वाटा आहे. माहिती ही शक्ती आहे. ती विकासाचे पायाभूत साधनं आहे. कारण माहिती ही समाजातील सर्व स्तरातील लोकांच्या गरजेची गोष्ट झालेली आहे. यातून माहितीप्रधान समाज निर्माण झाला आहे.

**डॉ. रंगनाथन यांचे सिद्धांत आणि उपयोगकर्त्यांकडून माहितीचा उपयोग:**

| ग्रंथालयाचे पाच सिद्धांत | माहितीचे सिद्धांत |
|---|---|
| ग्रंथ हे उपयोगासाठी आहेत | माहिती उपयोगासाठी |
| प्रत्येक वाचकाला त्याचा ग्रंथ मिळावा | प्रत्येक उपयोगकर्त्याला त्याची माहिती मिळावी |
| प्रत्येक ग्रंथाला वाचक मिळावा | प्रत्येक माहितीला उपयोगकर्ता मिळावा |
| वाचकांचा वेळ वाचावा | माहितीच्या उपयोगकर्त्याचा वेळ वाचावा |
| ग्रंथालय वर्धिष्णू आहे | माहितीत सतत वाढ होत असते |

**निष्कर्ष :**

माहितीचा उगम, मानवाच्या दैनंदिन अनुभव, घटना, प्रसंग, यातून होत असतो. त्यामध्ये नवीन विकास प्रकल्प, शाशकीय कार्यक्रम संशोधन, इत्यादी मुळेही माहिती निर्माण होत असते. माहिती एकत्रित करण्याचे अनेक मार्ग आहेत. इतिहासात माहिती ताम्रपट, शिलालेख, पपायरस, यावर एकत्रित केलेली आपण वाचतो. पण पुढे मुद्रणकलेच्या शोधामुळे कागदाच्या शोधामुळे कागदाच्या माध्यमामुळे ग्रंथ, नियतकालिके, पारंपारिक, अपारंपरिक मुद्रित, अमुद्रित स्वरुपात एकत्र केलेली माहिती वेगवेगळ्या परिणामात आकारात मांडली गेली. ग्रंथालयातून ग्रंथसंग्रहाच्या स्वरुपात ही माहिती साठवली जाते. व डॉ. एस. आर. रंगनाथन यांनी सांगितलेल्या वरील सिद्धांतानुसार ग्रंथालय व माहितीकेंद्राचे कार्य चालते. त्यामुळे वाचक, उपयोगकर्ते आणि ग्रंथालय सेवक यांना सुद्धा ग्रंथालय आणि माहितीकेंद्रात आनंद मिळतो. ग्रंथालय आणि माहितीकेंद्रात, वाचनसाहित्याचे जतन करणे, माहिती एकत्रित करणे, तिचे जतन करणे, तिचा साठा करणे, यासाठी संगणक तर वरदानच आहे. ग्रंथालये माहितीचे एकत्रीकरण, व्यवस्थापन आणि प्रसार या क्षेत्रात महत्वाचे कार्य करतात. प्रलेखन, निर्देश, सार याचा संग्रह करतात व जागरूक सेवेमुळे याविषयी प्रसारही करतात.या दृष्टीकोनातून डॉ. एस. आर. रंगनाथन यांनी सांगितलेले गेंथालय शास्त्राचे पाच मूलभूत सिद्धांत हे अनमोल वरदान आहे आणि पुढील अनेक पिढ्यासाठी ते अनमोल राहणार आहे, असे मला वाटते.

**ग्रंथसूची :**

१. कुलकर्णी सुहास आणि इतर : यांनी घडवलं सहस्त्रक य रोहन प्रकाशन (२००३), पुणे.

२. नरगुंदे, रेवती.: ग्रंथालय आणि सामाजिक विकास, युनिव्हर्सल पब्लिकेशन (२०१३), पुणे.

३. जैन, प्रकाश व इतर: सुलभ ग्रंथालय शास्त्रय विश्व प्रकाशन (२००९), नागपूर.

४. पारखी, गंगाधर र. : ग्रंथालयशास्त्र परिचय, युनिव्हर्सल पब्लिकेशन (२००८), पुणे.

५. कोण्णूर, एम. बी. आणि इतर : ग्रंथालय व माहितीशास्त्रकोश (२००८), पुणे.